10th Pune International Film Festival 2012

१७ जानेवारी २०१२

# 'एनी टाईम एनी व्हेअर'

हमरस्ते निर्माण झाले, गाड्यांचे वेग वाढले पण त्याचबरोबर हमरस्त्यांवर भयंकर अपघात घडण्याचे प्रकारही वाढले. याच विषयावर तामिळ भाषेतला मएनी टाईम एनी व्हेअरफ हा महोत्सवात सादर करण्यात आलेला चित्रपटही विचार करायला लावणारा आहे.

या चित्रपटाच्या निमित्ताने निरुपमा सुंदर यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, महामार्गावर अपघात होतात. त्यावेळी २५-३० माणसे ठार झाली. तेवढीच जखमी झाली अशा स्वरुपाच्या बातम्या वाचायला मिळतात. लोकांनाही त्याची सवय होऊन जाते आणि पुढे त्याचे गांभीर्यही उरत नाही. त्याच विषयावर हा चित्रपट आहे.

तामिळ चित्रपटांच्या नियोजनबद्ध कामांबाबत सर्वत्र उत्सुकता असते. त्या संदर्भात बोलताना त्या म्हणाल्या की या चित्रपटाचे संपूर्ण कथानक आणि चित्रीकरणाचा कार्यक्रम आधी तयार करम्यात आला होता.

आता व्यावसायिक चित्रपटांकडून तामिळ चित्रपट कलात्मक होण्याकडे लक्ष देत आहेत. व्यावसायिक चित्रपटांमध्ये कथेपेक्षा अन्य गोष्टींवर अधिक भर दिला जातो. उलट आता चित्रपटाच्या कथेकडे लक्ष देण्यात येत आहे. त्यामुळे चित्रपट आणखी विकसीत होत आहेत. नव्या पिढीतील अनेक कलाकार यामुळे सर्वस्व ओतून काम करीत आहेत. परिणामी तामिळ चित्रपटसृष्टी वेगाने प्रगती करत आहे.

प्रवीण प्र. वाळिंबे

प्रवीण प्र. वाळिंबे
मीडिया को-ऑर्डिनेटर
९८२२४ ५४२३४ / ९४०५० ३५४५८

Pune Marathon Bhavan, Near Mitra Mandal Colony, Opp. Parvati P. O.,
Pune - 411009, India. Tel: +91 20 24424545, Fax: +91 20 24428788,
Email: piff.india@gmail.com Website: www.puneinternationalfilmfestival.com
R. No. : F - 24914 / Pune S/R. No. : MAH / 1325 / 2009 / Pune

ORGANIZED BY Pune Film Foundation

JOINTLY WITH Government of Maharashtra